# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा परीक्षा (गट ब व गट क)

# Maharashtra Non Gazzeted Services Examination (Group B and Group C)

**परीक्षेचे टप्पे- १. संयुक्त पूर्व परीक्षा- १०० गुण**

**२. स्वतंत्र मुख्य परीक्षा - ४०० गुण (एकूण २ पेपर)**

**३. शारीरिक चाचणी व मुलाखत - केवळ पोलीस उप-निरीक्षक पदाकरीता शारीरिक चाचणी - १०० गुण व मुलाखत - ४० गुण.**

**४. सहायक मोटार वाहन निरीक्षक गट- क पदाच्या पूर्व परीक्षेकरीता सदर अभ्यासक्रम लागू. मात्र, स्वतंत्र मुख्य परीक्षा - ३०० गुण.**

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

## Maharashtra Non Gazzeted Services Combined Preliminary Examination (Group B and Group C)

### -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकेची संख्या - एक**

| विषय व सांकेतांक | प्रश्नसंख्या | एकूण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता चाचणी (सांकेतांक क्र. १०६१) | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

### -: अभ्यासक्रम :-

| अनु. क्रमांक | विषय |
|---|---|
| | **सामान्य क्षमता चाचणी** |
| १) | **इतिहास** -आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास. |
| २) | **भूगोल** - महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्याससह - पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या, उद्योगधंदे, इत्यादी. |

| | |
|---|---|
| ३) | **अर्थव्यवस्था -**<br>**भारतीय अर्थव्यवस्था** - राष्ट्रीय उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीति, इत्यादी.<br>**शासकीय अर्थव्यवस्था** - अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी. |
| ४) | **चालू घडामोडी** - जागतिक तसेच महाराष्ट्रासह भारतातील. |
| ५) | **राज्यशास्त्र** |
| ६) | **सामान्य विज्ञान** - भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), प्राणिशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र (Botany), आरोग्यशास्त्र (Hygiene). |
| ७) | **अंकगणित** - बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश, अपूर्णांक व टक्केवारी इत्यादी |
| ८) | **बुध्दिमापन चाचणी –**<br>उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न |

**दिनांक – १५ नोव्हेंबर, २०२२**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com